# पुण्यनगरीतील नाट्यनिर्मितीवर ‘पडदा’ ?

Chintamani.Patki
@timesgroup.com
Tweet : @ChintamanipMT

पुणे : मराठी नाटकांना प्रेक्षक नाही, अशी ओरड सातत्याने केली जात असताना अलीकडच्या काळात अनेक नाटकांनी रंगभूमीवर चांगलीच गर्दी खेचली आहे. नाट्यरसिकांची पावले नाट्यगृहांकडे वळविण्यात मुंबई येथील नाट्यसंस्थांची निर्मिती असलेल्या नाटके अग्रभागी असून, महागडी तिकिटे खरेदी करून नाट्यरसिक प्रयोगांना हजेरी लावत आहेत. मुंबईच्या नाट्यनिर्मिती संस्थांची घौडदोड सुरू असताना, गर्दी खेचणाऱ्या नाटकांमध्ये पुण्यातील नाट्यसंस्था मागे पडल्या आहेत. पुण्यातील व्यावसायिक, प्रायोगिक व हौशी रंगभूमीने मोठा ‘पॉज’ घेतल्याचे चित्र असून पुण्यातील नाट्यनिर्मितीवर ‘पडदा’ पडू नये, अशी अपेक्षा नाट्यवर्तुळातून व्यक्त होत आहे.

नाटकांसाठी हक्कांचे शहर असलेल्या पुण्यात नाटकांना प्रेक्षक कायम आहे, पण तो मुंबईच्या नाटकांसाठी. पुण्यातील नाट्यनिर्मिती जवळपास बंद झाली आहे. रंगभूमी गाजवेल अशा नाटकाची पुण्यातून निर्मिती होऊन आता काळ लोटल्याचे मानले जात आहे. पुण्यातील अनेक कलाकार नाट्यपरंपरा जपण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहेत; पण सशक्त नाट्यसंस्था आणि दमदार कथा यांच्या अभावामुळे प्रयत्न अपुरे पडत आहेत. सध्या रंगभूमीवर संगीत देवबाभळी, हॅम्लेट, साखर खाल्लेला माणूस, अलबत्या गलबत्या, पुन्हा सही रे सही, अनन्या, वाडा चिरेबंदी, मग्न तळ्याकाठी, युगांत, अरण्यक, वन्स मोअर, अमर फोटो स्टुडिओ, कार्टी काळजात घुसली या नाटकांची चलती आहे. एका लग्नाची पुढची गोष्ट, चल तुझी सीट पक्की व नटसम्राट या आगामी नाटकांबद्दल रसिकांमध्ये उत्सुकता वाढली आहे. ही सर्व नाटके मुंबईतील नाट्यसंस्थांची निर्मिती आहे. नाटकांच्या या भाऊगर्दीत आपले अस्तित्व दाखवेल असे पुण्याचे एकही नाटक नाही.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पुणे शाखेचे उपाध्यक्ष दीपक रेगे, काही कलाकार आणि निर्माते यांच्याकडून नाट्यनिर्मितीचे प्रयत्न सुरू आहेत. मामला चोरीचा, आबा की आयेगी बारात, लाइफ पार्टनर, कुर्यात सदा टिंगलम या नाटकांची निर्मिती करण्यात आली आहे. पण, यातील काही नाटके जुनीच आहेत. ‘निर्माते आता फारसे कार्यरत नाहीत. नवीन निर्माते पुढे येण्याची गरज आहे. दमदार कथानकाचा अभाव असल्याने जुन्याच नाटकांचा आधार घ्यावा लागतो,’ असे रेगे यांनी ‘मटा’ला सांगितले.

रंगभूमीवर मुंबईची नाटक जोरात आहेत. मात्र पुण्याची नाट्यचळवळ थंड पडली आहे का, या प्रश्नावर नाट्य परिषदेच्या पुणे शाखेचे माजी अध्यक्ष सुरेश देशमुख, उपाध्यक्ष दीपक रेगे, भरत नाट्य संशोधन संस्थेचे अध्यक्ष आनंद पानसे, तसेच नाट्य व्यवस्थापक समीर हंपी यांनी सहमती दर्शवली. मात्र, दिवाळीच्या दरम्यान नाटकांची मेजवानी अनुभवता येईल, याकडे हंपी यांनी लक्ष वेधले.

### प्रयत्न सुरू आहेत...

‘नाट्य चळवळ पूर्ण बंद नाही. उल्लेख करावा, असे नाटक नाही हे खरे आहे. पण, अगदीच काही प्रयत्न होत नाहीत, असे नाही. उतारणीचा एखादा काळ असतो. व्यावसायिक रंगभूमीवर आधीपासून मुंबईचे वर्चस्व आहे. काही अपवाद सोडले तर पुण्याची निर्मिती संस्था नाही,’ असे निरीक्षण काही कलावंतांनी मांडले.





## त्यांचा मतदानाचा अधिकार काढून घ्या

### रामदेव यांची मागणी

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

‘या देशात जे लोक माझ्यासारखे अविवाहित राहतील त्यांचा विशेष सन्मान करण्यात यावा. त्याचप्रमाणे जे लोक लग्न करतील आणि दोनपेक्षा अधिक अपत्यांना जन्माला घालतील त्यांचा मतदानाचा अधिकार काढून घ्यायला पाहिजे,’ अशी मागणी योगगुरू रामदेवबाबा यांनी केली आहे.

हरिद्वार येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना रामदेवबाबा यांनी ही मागणी केली. ‘हा राजकीय आणि राष्ट्रीय मुद्दा आहे. भारताची लोकसंख्या कमी होती, तेव्हा ज्यादा मुलांना जन्माला घालण्याचे समर्थन करण्यात आले. १० अपत्यांना जन्माला घालण्याचेही आवाहन करण्यात आले,’ असे सांगतानाच ‘ज्यांच्याकडे सामर्थ्य आहे आणि ज्यांची गरज आहे त्यांनी मुलांना जन्माला घालावे,’ असा सल्लाही त्यांनी दिला. सध्या देशाची लोकसंख्या सव्वा कोटीपर्यंत गेल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले.

## अंकलिपी



दिवाळी अंक म्हणजे महाराष्ट्रातील दिवाळीचा एक अविभाज्य भाग. १०० वर्षांपेक्षा अधिक काळाची संस्कृती या शब्दोत्सवास आहे. जुन्याजाणत्यांचे लिखाण जसे या अंकांतून वाचायला मिळते, तसेच नव्या दमाच्या लेखक, कवींची ओळखही या अंकांतून होते. याच अंकांची ओळख करून देणारी ही 'अंकलिपी'...

### मुक्त शब्द



चांगलं साहित्य देतानाच, सोबत विचारांचा एक वारसाही द्यावा, असा नेहमीचा विचार ‘मुक्त शब्द’च्या यावर्षीच्या दिवाळी अंकामागेही आहे. ‘जातिव्यवस्था आणि साहित्य’, ‘समकाल आणि मी’ या दोन विभागांतून ते थेटच प्रतीत होतं. या विभागांतील संध्या नरे-पवार, वंदना भागवत, रणधीर शिंदे, सुनील तांबे, राजीव नाईक, प्रेमानंद गज्वी, प्रवीण बांदेकर यांचे लेख वाचकांच्या विचारांना दिशा देणारे आहेत. त्याशिवाय मीना कर्णिक, संध्या गोखले, सुकन्या आगाशे, हरिश्चंद्र थोरात, हेमंत देसाई यांचे लेखही वाचनीय आणि अभ्यसनीय आहेत. मेघना भुस्कुटे यांचा पुलंवरचा लेख पुलंकडे वेगळ्या दृष्टीने पाहायला लावणारा आहे. याशिवाय सुषमा देशपांडे, जी. के. ऐनापुरे, अविनाश गायकवाड, रफिक सूरज, पंकज कुरुलकर आणि प्रतिमा जोशी यांच्या कथांनी कथाविभाग सजलेला आहे.

संपादक : येशू पाटील, किंमत : २८०

### वाघूर



मुखपृष्ठापासून विषयापर्यंत वाचकांचं लक्ष वेधून घेणारा हा अंक आहे. ‘नदी’ हे ‘वाघूर’चं मुख्य विषयसूत्र आहे. त्यामुळे नदीशी-पाण्याशी संबंधित ललितलेख, कथा, निबंध, मुलाखत आणि कविता अशा वैविध्यपूर्ण मजकुराने हा अंक सजलेला आहे. मात्र पाणी या एकाच विषयाभोवती हा अंक गुंफलेला असतानाही, तो एकसुरी झालेला नाही. उलट पाण्याचे एवढे विविध पैलू, पेड या अंकात उलगडत जातात, की वाचकासमोर पाण्याची एक वेगळीच दुनिया खुली होते. वसंत आबाजी डहाके, गो. तु. पाटील, मुकुंद कुळे, शैलेंद्र भंडारे, रश्मी कशेळकर, गणेश दिघे, सुधीर देवरे, अजय कांडर, हरी नरके, संदीप सावंत, प्रसाद कुमठेकर, असे अनेकांचे लेख या अंकात आहेत. पाण्याविषयीच्या मान्यवर कवींच्या कविताही आहेत.

संपादक : नामदेव कोळी, किंमत : २५०

### सकाळ साप्ताहिक



माहितीपूर्ण लेखांसोबतच दीर्घकथा, गूढकथा, विज्ञानकथा आणि कवितांची मैफल अशा भरगच्च साहित्य फराळाची मेजवानी अंकातून मिळेल. ‘पोस्ट टुथ’ आणि ‘फेक न्यूज’ या शब्दांचे नेमके अर्थ, त्यांच्याशी निगडित राजकीय संदर्भ यांचा वेध डॉ. बाळ फोंडके यांनी घेतला आहे. आजूबाजूच्या निसर्गात उगवणाऱ्या पण दुर्लक्षित झालेल्या मात्र निसर्गाच्या साखळीत गवताची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते, हे सांगणारा डॉ. मंदार दातार आणि बांबूचे नानाविध उपयोग रंजक पद्धतीने सांगणारा डॉ. अनिल अवचट यांचे लेख माहितीपूर्ण. भटकंतीच्या विविध टप्प्यांवर मिळालेले अनुभव गणेश देवी आणि माधव गाडगीळ यांनी शब्दबद्ध केले आहेत. अभिनेत्री आणि लेखिका विभावरी देशपांडे यांनी लोकशाहीला उद्देशून व्यक्त केलेले मनोगतही उल्लेखनीय.

संपादक : ऋता बावडेकर, किंमत : ११०

### मराठी विज्ञान परिषद पत्रिका




विज्ञान विषयाची चहुअंगाने दखल घेणारा असा हा अंक आहे. गोंदणाचे स्वप्नरंजन, सुखाचे जैवरसायनशास्त्र, फुलपाखरांसाठी बाग, प्लास्टिकबंदीचे वास्तव, कचरा नव्हे... संपत्ती, चवींची जाणीव या विषयांवर उहापोह करण्यात आला आहे. कोन टिकी या मोहिमेचा आढावा घेणारा लेखही माहितीपूर्ण आहे. कलाविषयात गणिताची महत्त्वाची भूमिका मांडणाऱ्या एशर याचा व त्यांच्या कलाकृतींचा परिचय करून देणाऱ्या लेखासह वेधक विज्ञानकथाही आहेत. बच्चेकंपनीसाठी खास गंमतजंमत असा विभाग रंजनातून माहिती देणारा आहे.

संपादक मंडळ : किंमत : १५०.

# दुधाच्या दातांनाही नीट जपा

डॉ. महेश सारोळकर, बीडीएस

लहान मुलांच्या दातांची काळजी घेऊनही बरेचदा दातांना कीड लागते. अशावेळी दुधाचेच दात आहेत म्हणून दुर्लक्ष करू नये. दुधाचे दात मुलांच्या नीट पोषणासाठी आवश्यक असतात. लहान मुलांचे पोषण योग्य न झाल्यास आयुष्यभरासाठी शरीरात व्याधी उत्पन्न होतात व मुलांची वाढ नीट होत नाही. दुधाचे दात वेळेपूर्वी काढल्यास जबड्याची वाढ नीट होत नाही. त्यामुळे चेहरा बेढब दिसू लागतो व नवीन येणाऱ्या पक्क्या दातांना पुरेशी जागा मिळत नाही व ते वेडेवाकडे येतात.



### आरोग्य मंत्र

**आता विविध उपचारांद्वारे दात वाचवता येतात व वरील समस्या टाळता येतात.**

१) पिट अ‍ॅण्ड फिशर सीलंट - ज्या मुलांमध्ये दुधाचे दात जास्त खोलगट असतात, अशा दातांना पिट अ‍ॅण्डफिशर सीलंट लावून कीड लागण्यापासून वाचवता येते.

२) फ्लोराइड - दातांचे डॉक्टर ठराविक वयाच्या मुलांना फ्लोराइड लावून कीड लागण्यापासून वाचवू शकतात.

३) पल्पोटॉमी/ पल्पेक्टॉमी/ रूटकॅनल - दाताच्या नसांपर्यंत कीड पोहोचल्यास या उपचारांनी पेशंटला पूर्ण आराम पडून दात वाचविता येतो.

४) स्टील/ झीरकोनिया कॅप- दाताचे कव्हर तुटल्यास या विविध कॅपद्वारे दात पुन्हा पूर्ण आकारात आणता येतात.

५) सिमेंट्स- दातांच्या रंगाचे सिमेंट भरून दातांची वरच्या भागातील कीड काढून टाकता येते.

६) स्पेस मेंटनर- एखाद्या पेशंटमध्ये नाईलाजास्तव वेळेपूर्वी दात काढावा लागल्यास येणाऱ्या पक्क्या दातासाठी जागा राखून ठेवण्यासाठी हा उपचार केला जातो.

७) ऑब्चुरेटर -फाटलेले ओठ/टाळू असलेल्या रुग्णाला दूधसुद्धा पिता येत नाही किंवा जेवता येत नाही. त्याला ‘ऑब्चुरेटर’द्वारे छिद्र बंद करता येते.

याव्यतिरिक्त अनेक उपचार आता उपलब्ध आहेत. जसे मुलांच्या सवयी सोडवण्यासाठीचे उपकरण, जबड्याची योग्य वाढ करणारे उपकरण आदी.

म्हणून दुधाच्या दातांकडे दुर्लक्ष न करता वेळीच उपचार केल्यास तुमच्या मुलांचे आरोग्य व व्यक्तिमत्त्व नीट राखता येते.

## GODFREY PHILLIPS INDIA LIMITED

CIN: L16004MH1936PLC008587:
website:www.godfreyphillips.com; email: isc-gpi@modi.com
Extract of Standalone Unaudited Financial Results
for the Quarter and Half Year ended September 30, 2018

(Rs. in lakhs)

| Sl. No. | Particulars | Quarter ended 30.9.2018 | Half Year ended 30.9.2018 | Quarter ended 30.9.2017 |
|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from Operations | 65950 | 125783 | 65406 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 10849 | 19240 | 8361 |
| 3 | Net Profit/(Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 10849 | 19240 | 8361 |
| 4 | Net Profit/(Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 7038 | 12712 | 5880 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 6973 | 12549 | 5782 |
| 6 | Equity Share Capital | 1040 | 1040 | 1040 |
| 7 | Basic and Diluted Earnings per Share (of Rs.2 each) (not annualised) (Rs.) | 13.54 | 24.45 | 11.31 |

Notes:

1. Consequent to introduction of Goods and Services Tax (GST) with effect from July 1, 2017, Central Excise [other than National Calamity Contingent Duty (NCCD) on cigarettes and chewing tobacco] and Value Added Tax (VAT) have been subsumed into GST. In accordance with Indian Accounting Standard – 18 on Revenue and Schedule III of the Companies Act, 2013, levies like GST, GST Compensation Cess and VAT are not included in Revenue from sale of products and services. Following additional information is being provided in this regard.

(Rs. In lakhs)

| Particulars | Quarter ended 30.9.2018 | Half Year ended 30.9.2018 | Quarter ended 30.9.2017 |
|---|---|---|---|
| Gross Sales Value inclusive of Taxes* (A) | 158517 | 296247 | 153502 |
| Taxes other than Excise Duty/NCCD (B) | 93182 | 171589 | 89449 |
| Revenue from sale of products and services [C=(A-B)] | 65335 | 124658 | 64053 |
| Other operating revenues (D) | 615 | 1125 | 1353 |
| Total Income from Operations (C+D) | 65950 | 125783 | 65406 |

2. The above is an extract of the detailed format of Statement of Standalone Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The detailed financial results and this extract were reviewed by the Audit Committee and approved at the meeting of the Board of Directors of the Company held on November 3, 2018. The full format of the Statement of Standalone Unaudited Financial Results are available on the Company's website (www.godfreyphillips.com) and on the websites of National Stock Exchange of India Limited (www.nseindia.com) and BSE Limited (www.bseindia.com).

3. The Limited Review, as required under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 has been completed on the detailed financial results for the Quarter and Half Year ended September 30, 2018 and the Limited Review Report of the Auditors has been filed with the Stock Exchanges. This Report does not have any impact on the 'Results and Notes' for the Quarter and Half Year ended September 30, 2018 which needs to be explained.



**Registered Office:** 'Macropolo Building', Ground Floor,
Dr. Babasaheb Ambedkar Road,
Lalbaug, Mumbai - 400 033.

For and on behalf of the Board
Sd/-
(K.K. Modi)
Managing Director

Place : New Delhi
Dated : November 3, 2018

